# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 09/06/2023 (शुक्रवार) सकाळ

---

### पोलीस स्टेशन खापरखेडा हद्दीमधील खापरखेडा टाऊन येथील
### जुगार अड्डयावर धाड
### पोलीस स्टेशन खापरखेडा यांची कारवाई

दिनांक ०८/०६/२०२३ पोलीस स्टेशन खापरखेडा येथील स्टाफ यांना गुप्त बातमीदारांमार्फत खबर मिळाली की, खापरखेडा टाऊन परिसरामधील व्हिडीओ गेम पार्लर मध्ये इलेक्ट्रॉनीक मशिनवर लोकांकडुन पैसे घेवुन मनोरंजनाचे नावाखाली मशीन वरील अंकावर पैश्याची बाजी लावुन हारजितचा जुगार खेळविला जात आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहिती वरून मा. उपविभागीय पोलीस अधिकारी कन्हान विभाग कन्हान यांची रेड करणेबाबत परवानगी घेवुन पोलीस स्टेशन स्तरावर ०७ वेगवेगळे पथक तयार करून ०७ वेगवेगळया व्हिडीओ गेमपार्लर वर टिम मार्फत रेड केली असता ०७ वेगवेगळया व्हिडीओ गेमपार्लर मधुन ८८ इलेक्ट्रॉनिक मशिन किंमती अंदाजे १७,६०,०००/—रू. नगदी १८०८०/— रू. व खुर्च्या किंमती अंदाजे ७२००/— रू. असा एकुण १७८५२८०/— रूपयाचा मुद्देमाल गुन्हयात जप्त करण्यात आला आहे. तसेच २६ आरोपीतांना ताब्यात घेण्यात येवुन ०७ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

सदरची कामगिरी ही पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. विशाल आनंद (भा.पो.से.) तसेच अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनात आशित कांबळे सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक तथा अतिरीक्त कार्यभार कन्हान विभाग, श्री. प्रविण मुंडे ठाणेदार खापरखेडा, सहायक पोलीस निरीक्षक श्री. दिपक कॉक्रेडवार, लक्ष्मी मलकुवार, पोलीस उपनिरीक्षक सुर्यप्रकाश मिश्रा, राजेश पिसे, सहायक फौजदार कैलास पवार, पोलीस हवालदार उमेश ठाकरे, शंकर काकडे, आशिष भुरे, प्रफुल राठोड, विनोद कनोजिया, संजय कासेकर, रंजना नागमोते, पोलीस नायक प्रदिप मने, प्रमोद भोयर, राजु भोयर, मुकेश वाघाडे, दिपक रेवतकर, किशोर येलेकर, बादल गिरी, पोलीस शिपाई शेखर वानखेडे, संदिप वाघमारे, अमित खोब्रागडे, राजकुमार सतुर, शत्रुगन वाहणे, योगेश तितरमारे, शुभांगी घुगल यांनी पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर